वर्ष ११ अंक १
आश्विन कार्तिक

# समतोल

दीपावली विशेषांक
२०१९



स्त्रीशक्तीच्या प्रबोधनाचे । ध्येय आपुले संतुलनाचे
समन्वयाचे सहभागाचे। समुन्नतीचे सुखवृद्धीचे ।

# निर्माणोके पावन युग में...

**प्रेरणा सेठिया**
(अभियंता, 'निर्माण' संस्थेमध्ये कार्यरत)



**सामाजिक कार्यासाठी युवा-नेतृत्व विकसित करण्याच्या 'निर्माण' या प्रयोगाला, अमृत बंग हे २००८ पासून lead करत आहेत. त्यांनी पुणे विद्यापीठातून Computer engineering चे व युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्वेनियामधून 'Non-profit management' चे शिक्षण घेतले. ते व त्यांची मानसोपचार-तज्ज्ञ पत्नी डॉ. आरती बंग हे दोघेही गडचिरोली जिल्ह्यात 'सर्च, शोधग्राम' येथे वास्तव्यास आहेत. त्यांची ज्ञान प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी आणि 'निर्माण'मध्ये काम करणाऱ्या प्रेरणा सेठियांनी घेतलेली ही मुलाखत...**

*** 'सर्च'मध्ये दैनंदिन कामात रुजू न होता, 'निर्माण'ची निर्मिती का करावीशी वाटली ?**

'सर्च'चं समाजाप्रतीचं योगदान वाढवण्यासाठी निर्माण ही नाविन्यपूर्ण संकल्पना अस्तित्वात आली. आणि ती एका प्रकारे 'सर्च'च्याच फिलॉसॉफीची आणि कामाची पुढची पायरी आहे. त्यामुळे माझ्या मनात असं द्वैत कधी आलंच नाही.

'सर्च' ही संस्था सुरू झाली ती ''आरोग्यस्वराज्य'' ही दृष्टी घेऊन. पण त्यामागची जी प्रेरणा आहे ती फक्त आरोग्यापुरती मर्यादित नसून त्याचा मूळ उद्देश हा एक नवीन समाज घडवण्याचा आहे. एक असा समाज जो चांगल्या मूल्यांवर आधारित आहे, ज्यामध्ये लोक जास्त आनंदी आणि सशक्त आहेत, तसेच ते आपल्या जीवनाचा सकारात्मक उपयोग स्वतःसाठी आणि समाजासाठी करत आहेत. असा स्वस्थ समाज तयार करणं हा मुख्य ध्यास आहे आणि अशा प्रकारचा समाज निर्माण व्हावा याची प्रेरणा असलेलं आणि क्षमता असलेलं युवा नेतृत्व कसं तयार होईल हे आम्ही 'निर्माण'च्या माध्यमातून बघतो. कारण सामाजिक प्रश्न हे काही आरोग्यापुरते किंवा गडचिरोलीपुरते मर्यादित नसून विविध क्षेत्रातले, भारतभरातले प्रश्न आहेत आणि कुठलीच एक संस्था याला पुरणारी नाही.



'सेव्हन हॅबिट्स ऑफ हायली एफ्फेक्टिव्ह पीपल' या पुस्तकाचे लेखक स्टीफन कोव्हे हे त्यांच्या पुस्तकात चार क्वाड्रँट्सची चर्चा करतात. त्यात क्वाड्रंट II विषयी बोलताना ते अशा कामांविषयी बोलतात जी तातडीची नाहीत पण महत्त्वाची आहेत. मला वाटतं की नवीन नेतृत्व घडवणं हे असं क्वाड्रंट II काम आहे. दुर्दैवाने क्वाड्रंट II च्या बहुतांश कामांकडे दुर्लक्ष केलं जातं, कारण बाकी बरीच तातडीची आणि महत्त्वाची कामं समोर असतात. तसेच युवा-नेतृत्व घडवण्याच्या कामांमध्ये होताना दिसतं. सर्वजण समोर दिसणारी आव्हाने पेलण्यात इतके गुंतून जातात की त्यांना या क्वाड्रंट II वर काम करायला पुरेसा वेळ मिळत नाही. जर आपण लांब पल्ल्याचा विचार केला तर हे युवा नेतृत्व घडण्याची खूपच गरज आहे. आणि 'निर्माण' ती पोकळी भरण्याचं काम करतं. मला सांगायला अतिशय आनंद होतो की या प्रक्रियेमधून गेलेले आमचे मित्र आज भारतभरातल्या ८० हून अधिक वेगवेगळ्या सामाजिक संस्थांबरोबर काम करत आहेत आणि त्याचबरोबर एक युवा नेतृत्व म्हणून घडत आहेत.

'निर्माण'सारख्या उपक्रमामध्ये काम करून मला असं जाणवतं की माझ्या कौशल्याचा अधिक चांगला वापर इथे होतो आणि 'सर्च'चं व्यापक स्वप्न साकारण्यासाठीसुद्धा मदत होते.

*** निर्माणची नेमकी संकल्पना/उद्देश काय?**

एका भागाविषयी आपण बोललो, की सामाजिक समस्यांचं आव्हान पेलू शकतील असं युवा नेतृत्व तयार करणं हा 'निर्माण'चा मुख्य उद्देश आहे. हे लांब पल्ल्याचं उद्देश जर साध्य करायचं असेल तर त्यासाठी ज्या युवांसोबत आम्ही काम करतो त्यांची भूमिका नेमकी काय आहे हे समजून घ्यायला हवं. आम्ही त्यांच्याकडे एक साधक म्हणून बघतो. ते आपल्या जीवनाची साधना करत आहेत आणि त्यांचं साध्य आहे की त्यांनी अधिक अर्थपूर्ण जगावं व त्यायोगे एक उन्नत समाज निर्माण करावा. त्यांच्या या साधनेच्या प्रक्रियेत त्यांना साधक म्हणून कशा प्रकारे सशक्त करता येईल हे पाहाणं आमचं काम आहे. म्हणून 'निर्माण'चा असा दुहेरी उद्देश

आहे, एक म्हणजे युवा/ नेतृत्वाचा विकास आणि दुसरं म्हणजे तरुण युवक-युवतींना त्यांच्या जीवनामध्ये अधिक अर्थपूर्ण कसं जगता येईल याच्यासाठी मदत करणे. खरंतर दुसरं उद्दिष्ट हे शैक्षणिक संस्थांनी करण्याचं काम आहे, पण बऱ्याच संस्था ह्या माहिती देतात, क्वचित प्रसंगी कौशल्य देतात पण जीवन-हेतू कधीच देत नाहीत. आणि म्हणून मला मिळालेल्या शिक्षणाचा, मी कमवलेल्या ज्ञानाचा उपयोग मी कोणासाठी करू, कशासाठी करू हे प्रश्न अनुत्तरित राहतात. याची कुठलीही नीट संधी न मिळाल्यामुळे बाहेरच्या जगात जी काही फॅशनेबल उत्तरे आहेत त्यांचाच अवलंब करायचा, हा मार्ग सोडून दुसरा कोणताही पर्याय आजच्या युवा पिढीसमोर उरत नाही. मला असं वाटतं की, या युवा पिढीला अर्थपूर्ण आणि समाधानी आयुष्य जगण्याचा हक्क आहे. आणि तो अर्थ शोधायच्या संधी उपलब्ध करून देणे हे आम्ही आमचं कर्तव्य मानतो. त्यामुळेच आम्ही 'निर्माण'ला 'एक शैक्षणिक प्रक्रिया' म्हणतो ज्या द्वारे युवांना अर्थपूर्ण जगता येईल. त्यांचं स्वतःचं जे उन्नतीकरण होईल त्याची फळं जर त्यांच्यापुरतीच मर्यादित राहिली तर मात्र याला उन्नतीकरण म्हणता येणार नाही. खऱ्या प्रकारे उन्नतीकरण होण्याचा निदर्शक 'स्व-च्या पलीकडे जाणे आणि समाजासाठी काम करणे' हा असला पाहिजे. हे साध्य करणे हे 'निर्माण' प्रक्रियेचं उद्देश्य आहे.

*** निर्माणची निवड प्रक्रिया कशी असते ? उच्चशिक्षित तरुण-तरुणींची निवड का करता ?**

'निर्माण'मध्ये आम्ही केवळ उच्चशिक्षित तरुण-तरुणींची निवड करतो हे म्हणणं अर्धसत्य ठरेल. आम्हाला याचा अभिमान आहे की भारतभरातील अनेक नामांकित कॉलेजेस आणि संस्थांमधून तरुण मुलं 'निर्माण'साठी अर्ज करतात आणि त्यांची निवडही होते. पण त्यासोबतच मला हे स्पष्ट करायला आवडेल की 'चांगल्या संस्थेमधून मी आलेलो आहे, यामुळे माझी निवड होईलच', असं म्हणणं अगदी चूक ठरेल.

आम्ही आमच्या निवड प्रक्रियेमध्ये वेगवेगळे पैलू बघतो. अर्थातच या उपक्रमाचा उद्देश्य हा 'स्व'च्या पलीकडे जाणे असा असल्यामुळे स्वतःच्या पायावर उभं राहता येणं आणि केवळ स्वतःच्या चरितार्थाच्या/आर्थिक प्रश्नांमध्ये गुरफटून न राहता त्याच्या पलीकडे जाता येणं, तशी क्षमता/वृत्ती असणं हा 'निर्माण'मध्ये निवड होण्यासाठीचा महत्त्वाचा निकष आहे. त्याबरोबरच नुसती क्षमता असून उपयोग नाही, मी इतरांसाठी काहीतरी केलं पाहिजे असं आतून वाटलं पाहिजे, तशी वैयक्तिक मूल्यव्यवस्था असली पाहिजे. आणि हे केवळ बोलून चालणार नाही, त्यामुळे याला कृतीमध्ये उतरवण्याची धमक असली पाहिजे किंवा याचा अनुभव असला पाहिजे. या काही गोष्टी आम्ही निवड प्रक्रियेमध्ये बघण्याचा प्रयत्न करतो. निर्माणमध्ये असे अनेक मुलं-मुली आहेत ज्यांचं फारसं फॉर्मल ट्रेनिंग झालेलं नाही, त्यांनी जीवन-विद्यापीठातूनच शिक्षण घेतलं आहे आणि प्रत्यक्षात काहीतरी करून दाखवलं आहे.

'निर्माण'ची निवडप्रक्रिया थोडक्यात सांगायची झाली तर ती तीन टप्प्यांमध्ये असते. 'निर्माण'च्या वेबसाईटवर एक अतिशय सुंदर आणि इंट्रोस्पेक्टिव्ह असा अर्ज आहे. मी माझ्या सगळ्या वाचक-मित्रांना आवाहन करीन की त्यांनी तो किमान एकदा बघावा. (http://www.nirman.mkcl.org/doc/nirman-application-form.pdf) या पहिल्या टप्प्यानंतर आम्ही मुलाखतीसाठी काही मुलांना निवडतो, त्यानंतर त्यांना काही असाइन्मेंट्स देतो आणि मग आम्ही अंतिम निवड करतो. या पूर्ण प्रक्रियेत एक महत्त्वाची गोष्ट अशी की निवडप्रक्रियेतील प्रत्येक टप्पा हा स्वतःमध्ये स्वयंपूर्ण आहे, मग तो अर्ज भरणे असो किंवा मुलाखत असो. हा प्रत्येक टप्पा हा आज ती व्यक्ती जिथे आहे त्यापेक्षा थोडी पावलं पुढे जायला तिला नक्कीच मदत करेल, ही आमची युवा मित्रांना कमिटमेन्ट आहे. आम्हाला अशी प्रक्रिया तयार करायची नाही की ज्यातून केवळ आमचं निवडप्रक्रियेचं उद्देश पूर्ण होतं पण त्यासाठी सगळी मेहनत घेणाऱ्या तरुण-तरुणींना यामधून काहीच मिळत नाही. असं झालं तर आमच्यामध्ये आणि बाकीच्या चाकोरीबद्ध परीक्षा प्रक्रियांमध्ये काहीच फरक राहणार नाही. प्रत्येक टप्प्यामध्ये त्या तरुण-तरुणींना शिकण्यासारखं काहीतरी नक्कीच असेल यावर आमचा जोर राहतो.

*** तुझ्या या १३ वर्षांच्या निर्माणच्या प्रवासामध्ये तुम्हाला कोण-कोणती आव्हानं आली आणि त्यांना तुम्ही कसं सामोरं गेलास ?**

आव्हानं तर बरीच आली. पण ती माझ्यासाठी वरदानच होती. कारण काहीच आव्हानं नसती आली तर मी काहीतरी उपयुक्त काम करतोय असं मलापण वाटलं नसतं. मी PICT या अभियांत्रिकी कॉलेजमधून पदवी घेतली आणि त्यानंतर एका मल्टिनॅशनल कंपनीमध्ये काम सुरू केलं. जेव्हा अशा प्रकारची नोकरी सोडण्याचा आपण विचार करतो तेव्हा अर्थातच बाकीचे मित्रं किंवा कंपनीमधले लोक सगळेच 'तू वेडा झालास का ?' असं म्हणतात. मला असं वाटतं की तिथेच एक चांगली संधी आपल्याला प्राप्त होते, हे बघायला की मला जे काही करावंसं वाटतं ते खरंच किती गंभीरपणे वाटतं ? केवळ याला काहीतरी ग्लॅमर आहे म्हणून किंवा मला मी सध्या जे करतोय त्याचा कंटाळा आलाय म्हणून अशा कारणांमुळे सामाजिक कार्याकडे वळू इच्छितो, का त्यामागचा काहीतरी खराखुरा विचार माझ्या मनामध्ये आहे म्हणून मला वळायचंय ? ही स्पष्टता मिळवणं

हेच मला असं वाटतं की पहिलं मोठं आव्हान होतं आणि त्यावर मी अजूनही काम करत असतो. यामुळेच मी टिकून राहू शकलो. मी मुळात अशा प्रकारचा रस्ता का निवडतो आहे याची पुरेशी स्पष्टता आणि कारणमीमांसा स्वतःला न विचारणं, यामुळे सामाजिक क्षेत्रात उतरलेल्या बऱ्याच व्यक्तींचा नंतर भ्रमनिरास होतो. आव्हानं जर पेलायची असतील तर मला ही स्पष्टता असणं भाग आहे की मी हे मुळात का करू इच्छितो?

दुसरं एक असं पण आव्हान म्हणता येईल की जेव्हा तुमचे आई-वडील हे स्वतः प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्ते असतात (नुकताच त्यांना पद्मश्री पुरस्कार देखील मिळाला) तेव्हा एक गंमत असते. तुम्ही काहीही चांगलं केलं तरी अशी प्रतिक्रिया असते की 'इसमें इतना बडा क्या है ? ये तो होनाही था । और ये नहीं तो कौन करेगा ?' किंवा काही छोटी चूक झाली, काही थोडासा वेगळा मार्ग अवलंबला तर मग 'याने हे कसं काय केलं? ही तर यांची फिलॉसॉफी नाही', अशी थोडी वृत्ती असते. त्यामुळे अशा प्रकारची एक थोडीशी अडचण कधीतरी उद्भवत असते. पण मला आनंद होतो की याची फारशी पर्वा ना माझ्या आई-वडिलांनी केली, ना मी केली. त्यामुळे मला मुक्तपणे जगता आलं. मला असं वाटतं की आई-बाबांच्या कामाचा आदर करावा आणि अभिमान बाळगावा, पण त्याबरोबरच आपण आपला वेगळा विचार जरूर करावा आणि आपल्या नवीन चुका कराव्यात. त्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही.

तिसरं आव्हान हे आहे संयम आणि दृष्टी विकसित करण्याचं. विशेषतः 'निर्माण'सारख्या संकल्पनेवर काम करताना, जिथे परिणाम दिसायला बराच वेळ लागतो. जर आपल्याला एखादा आरोग्य, शेती किंवा साक्षरतेचा उपक्रम करायचा असेल तर अशा प्रकारच्या उपक्रमांचा परिणाम दिसण्याचा काळ हा साधारण २-३ वर्षं असतो, तुलनेने माणसं घडवण्याच्या उपक्रमाला बराच वेळ लागतो. त्याला कधी ५-१० वर्षं लागू शकतात आणि खरं रूप दिसायला तर ३०-४० वर्षं सुद्धा लागू शकतात. इतका लांब पल्ल्याचा विचार करण्याची क्षमता आणि तितका काळ धीर धरण्याची क्षमता विकसित करणं हे एक मोठं आव्हान असतं. हे स्वीकारण्यासाठी यासाठी मला बराच वेळ लागला. अशी एक गोष्ट सांगितली जाते की एक लहान मुलगा झाड लावतो आणि मग रोज काढून बघतो की किती वाढलं. तसं आधी माझ्याही सोबत व्हायचं. पण आता परिणाम दिसायला जर ३० वर्षं लागणार असतील तर मग करायचं काय ? त्यासाठी आपण काही मध्यंतरीच्या अशा पायऱ्या विकसित केल्या पाहिजेत की ज्यामुळे आपल्याला हे समजेल की आपण जे काम करत आहोत त्याची दिशा ही आपल्या लांब पल्ल्याच्या उद्देशाशी सुसंगत आहे का, आणि त्या दृष्टीने आपली वाटचाल नीट होत आहे का! ह्या मधल्या पायऱ्या बघता येणं आणि तशी दृष्टी विकसित करता येणं हे एक महत्त्वाचं आव्हान होतं. यामुळे आपली प्रेरणा टिकून राहायला मदत मिळते आणि जर काही बदल अपेक्षित असतील तर ते सुद्धा अधिक परिणामकारक पद्धतीने करता येतात.

अजून एक बाब म्हणजे, निर्माणमध्ये सहभागी होणाऱ्या मित्रांवर आमचा जो काही सकारात्मक प्रभाव असतो, तो नैतिकता, ज्ञान आणि प्रेम या तीन आधारांवर असतो. तो कोणत्याही प्रकारच्या राजकीय, प्रशासकीय किंवा आर्थिक शक्ती असे जे काही जगामध्ये बदल घडवून आणण्याचे तथाकथित निकष असतात, त्यामुळे नसतो. आम्ही त्यांचे मार्क्स नियंत्रित करू शकत नाही किंवा त्यांचा पगारही वाढवू शकत नाही. याच्याशिवाय काम करता येणं आणि एक सकारात्मक बदल घडवता येणं हे एक मोठं आव्हान आहे. सुदैवाने या आव्हानांना काही प्रमाणात आम्ही पेलू शकलोय आणि पुढची वाटचाल चालूच आहे.

*** पुढच्या १०-२० वर्षांनी मागे वळून बघताना निर्माणचं काय चित्रं तुम्ही बघता ?**

त्याबद्दल माझ्या मनामध्ये बऱ्याच कल्पना आहेत, स्वप्नं आहेत. मला असं वाटतं की महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभरात साधारण दहा हजार तरुण-तरुणी निर्माण प्रक्रियेशी जोडलेले असतील, विविध ठिकाणी वेगवेगळ्या सामाजिक प्रश्नांवर कार्यरत असतील. आणि जर तुम्ही भारताचा नकाशा रात्री बघितलात, जिथे अज्ञानाची किंवा अन्यायाची रात्र आहे, तिथे तुम्हाला निर्माण - युवांच्या रूपात असंख्य दिवे लुकलुकताना दिसतील!

दुसरं मला असं वाटतं की, एक युवक म्हणून मी अधिक अर्थपूर्ण कसं जगू, माझ्या अवतीभवतीच्या समाजाप्रति माझं उत्तरदायित्व कसं पूर्ण करू आणि माझ्या कामात उत्तमता कशी आणू, हे आजच्या युवकांना लक्षात आलं पाहिजे. मला मिळमिळीत आणि सरधोपट जगण्याची प्रचंड चीड आहे. मला अतिशय वाईट वाटतं की आपला बहुतांश युवा-वर्ग हा या जंजाळामध्ये फसलेला आहे. आणि 'त्यांना ते आवडतं' म्हणून ते असं करतात असं नसून, 'त्यांना यातून बाहेर पडण्याचा दुसरा मार्ग दिसत नाही.' तर यामधून बाहेर पडून वेगवेगळे मार्ग ते स्वीकारतील असंही मला वाटतं.

Courage (धैर्य) या मूल्याची अभिव्यक्ती ही युवा-वर्गामध्ये कशी होईल यावर काम झालेलं असावं. कारण जर एक मूल्य आपण म्हणलं जे युवा-पिढीला बाकी वयोगटांपासून वेगळं ठरवतं तर ते courage (धैर्य) हे आहे. त्यामुळे असे काही मूल्यात्मक बदल किंवा सांस्कृतिक बदल हे भारतातील युवा

पिढीमध्ये घडत असावेत असं मला वाटतं.

याबरोबरच 'निर्माणी' ज्या प्रश्नावर काम करत असतील मग ते आरोग्य असो, शिक्षण असो, पर्यावरण असो किंवा रोजगार असो, यामध्ये सकारात्मक आणि दृश्य परिणाम आमच्या हस्ते घडून आलेला असावा.

युवा-पिढी ही भारताची ताकद आहे हे आपण सगळे मानतो, या युवा-पिढीचं अर्थपूर्ण जगणं, त्यांची सामाजिक प्रेरणा यासंदर्भातली "ज्ञान-निर्मिती" ही निर्माणने केली असावी. अशा अनेक वेगवेगळ्या कल्पना आमच्या नजरेसमोर आहेत.

*** आजच्या युवा-पिढीसमोर काय आव्हानं आहेत असं वाटतं ? आणि त्यांच्याकडून तुमच्या अपेक्षा काय?**

आव्हान कशाला म्हणायचं हे पहिल्यांदा समजून घेतलं पाहिजे. कारण ते समजलं नाही तर दुर्दैवाने अडचणींनाच आव्हान समजण्याचा एक बौद्धिक आणि भावनिक असा घोळ होऊ शकतो. छोट्या छोट्या अडचणी येत असतात आणि येत राहणार आहेत. पण जर एक आव्हान जे आत्ताच्या युवा-पिढीसाठी सगळ्यात महत्त्वाचं आहे असं म्हणायचं झालं तर ते हे आहे की 'आव्हान स्वीकारण्याचं आव्हान आम्ही घेणार का'. जे चालत आलंय, जे सरधोपट आहे, ज्यामध्ये जास्त सुरक्षितता वाटते यामध्ये आम्ही स्वतःला गुंतवणार का खरी आव्हानं पेलणार, हे ठरवता आलं पाहिजे. कारण हे जोपर्यंत आपण ठरवत नाही तोपर्यंत मोठं काही करण्याची शक्यतासुद्धा उद्‌भवत नाही.

दुसरं आव्हान जे आजच्या तरुणांपुढे आहे ते म्हणजे डिग्रीच्या आणि रेझ्युमेच्या पोकळ यशाला भुलून न जाता जीवनात प्रत्यक्ष कर्तृत्व करून दाखवणे या 'acid test' (कठोर परीक्षण) कडे आपण किती लवकर वळू आणि किती गंभीरपणे याचा अवलंब करू? मला अतिशय वाईट वाटतं की आपल्याकडील बहुतांश डिग्र्या या तशा पोकळ आहेत, पण निव्वळ त्याच घेण्यामध्ये आणि मिरवण्यामध्ये लोकांचा खूप वेळ जातो. डिग्री घेण्यात काहीच गैर नाही पण ते करताना सोबत आपण कौशल्यं घेतोय का हे बघायला पाहिजे. त्याचबरोबर ती कौशल्यं घेतल्यावर 'पुढे काय' हा प्रश्नदेखील पडला पाहिजे. शिक्षण घेणे हे काही आयुष्यातलं अंतिम ध्येय नाही. ते एक साधन आहे, आणि ते कशासाठी वापरलं पाहिजे याविषयीची चर्चा आणि चिंतन होणं आवश्यक आहे. अनेक तरुण मुलं-मुली आपल्या आयुष्याचं पूर्ण नियोजन हे त्यांच्या मनातल्या एका काल्पनिक रेझ्युमेवर त्यांचं आयुष्य कसं दिसेल, त्या पद्धतीने करतात. मला हा विचार फारच संकुचित वाटतो. त्यामुळे या सगळ्याच्या पलीकडे जाणारं काहीतरी लांब पल्ल्याचं स्वप्नं मला आहे का ज्याच्या आधारावर तात्कालिक फायद्या-तोट्याच्या पलीकडे जाऊन मी माझ्या जगण्याची आखणी करू शकतो, असा काहीतरी उद्देश शोधता येणं हे युवांपुढचं सगळ्यात मोठं आव्हान आहे.

मला बहुतांश तरुण-तरुणींचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन हा असा दिसतो की, 'मी जे काही करतो आहे त्यामध्ये माझ्यासाठी काय आहे? मला काय मिळेल?' यामागची मनस्थिती ही 'मी इथे घेण्यासाठी आहे' अशी आहे. मी त्यांना दोषीही मानणार नाही. कारण आपली शिक्षण-व्यवस्था ही अशाच प्रकारची विचार-प्रक्रिया डोक्यात भरवत असते. बऱ्याच प्रसंगी पालकांचीसुद्धा यामध्ये भूमिका असते. त्यांचं प्रेम हेसुद्धा कधीकधी आपल्या मुलांच्या adult बनण्याच्या मार्गामध्ये आडवं येतं. 'तू चिंता नको करूस, तुला काय पाहिजे ते सांग' असं म्हणून या मुलांची child mentality (बालबुद्धी) जतन करतात. त्यामुळे या मुलांचा जगाकडे, कामाकडे, नातेसंबंधांकडे बघण्याचा दृष्टिकोन, जीवनसाथी निवडण्यामागचा दृष्टिकोन आणि त्याचबरोबर सामाजिक काम करण्याचा दृष्टिकोन हा बऱ्याचदा असाच दिसतो की, 'यामध्ये माझ्यासाठी काय', 'मला यामधून काय मिळेल ?' काहीतरी जरूर मिळावं, काही पैसे जगण्यासाठी लागतील, ज्ञान-निर्मितीचा आनंद मिळावा, चांगले मित्र-मैत्रिणी मिळावेत. हे सगळं तर हवंच. पण जर मी स्वतःला तरुण म्हणवतो तर आपला default response आणि त्यामागची मनोभूमिका ही अशी असली पाहिजे की 'मी इथे देण्यासाठी आहे, घेण्यासाठी नाही' याची गंमत अशी की ज्या क्षणी आपण हा बदल आपल्या विचारांमध्ये करतो, आपण प्रत्येकच परिस्थितीकडे प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने बघतो आणि solution-centric विचार करायला लागतो. आपला एकूणच दृष्टिकोन हा तक्रारी करण्याचा, स्वतःलाच कुरवाळत बसण्याचा राहत नाही. उलट कुठल्याही परिस्थितीमध्ये मी काय करू शकतो याचा विचार आपण करायला लागतो. आणि स्वतः वंचकाच्या भूमिकेतून बाहेर येतो.

माझ्या क्षमतेमध्ये माणूस म्हणून, व्यावसायिक म्हणून किंवा एक भारताचा नागरिक म्हणून मी काय करू शकतो हे आपल्याला बघता येऊ शकेल. हा एक जरी विचारातील बदल आमची युवा-पिढी करू शकली, तर त्यांचं आयुष्य आनंदी होईल, productive होईल. आणि मग त्यांचं कुटुंब असो, काम करण्याची जागा असो, समाज असो वा देश असो, ह्या सर्व ठिकाणी एका active-contributor (कृतीशील सदस्य)ची भूमिका ते निभावू शकतील.

- मो. : ८२७५८६७१५८

❖ ❖ ❖